# भारत निवडणूक आयोगाकडून घोषित
# १ जानेवारी २०१० या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र
# मतदार यादयांचे पुनरिक्षण कार्यक्रम

## वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादयांची प्रसिध्दी | दिनांक १ जुलै २०१० (गुरुवार) |
| २ | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी | दिनांक १ जुलै २०१० (गुरुवार) ते दिनांक १६ जुलै २०१० (शुक्रवार) |
| ३ | दावे व हरकती स्विकारण्यासाठीच्या विशेष मोहिमांचे दिनांक | दिनांक १० जुलै २०१० (शनिवार) व दिनांक ११ जुलै २०१० (रविवार) |
| ४ | दावे व हरकती निकालात काढण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २ ऑगस्ट २०१० (सोमवार) |
| ५ | घरोघरी जाऊन घेतलेल्या मतदारांच्या नोंदीमधील दुरुस्ती व स्कॅनिंग इत्यादी कामे करण्याचा कालावधी | दिनांक १ जुलै २०१० (गुरुवार) ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१० (मंगळवार) |
| ६ | पुरवणी मतदार यादी तयार करणे | दिनांक ३ ऑगस्ट २०१० (मंगळवार) ते दिनांक २४ ऑगस्ट २०१० (मंगळवार) |
| ७ | मतदार यादयांची छपाई | दिनांक १ सप्टेंबर २०१० (बुधवार) ते दिनांक १४ सप्टेंबर २०१० (मंगळवार) |
| ८ | अंतिम मतदार यादया प्रसिध्दी दिनांक | दिनांक १५ सप्टेंबर २०१० (बुधवार) |



Please purchase PDF Split-Merge on www.verypdf.com to remove this watermark.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक/विधानसभा सार्वत्रिक
निवडणूक व छायाचित्र मतदार यादी पुर्नरिक्षण

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक - सगृयो- २००९ प्र.क्र.२३५/१४-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १९ एप्रिल, २०१०.

**परिपत्रक**

मा. केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेमार्फत सतत मतदार याद्या/निवडणूक ओळखपत्र अद्ययावत करण्याचे काम चालू असते. सदर कामासाठी नोंदणीकृत गृहनिर्माण सहकारी संस्थामधील सभासद राज्य निवडणूक आयोग/जिल्हा निवडणूक आयोगामार्फत नियुक्त केलेल्या कर्मचारीवर्गास अपेक्षित सहकार्य करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे राज्याचे मुख्य निवडणुक अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, केलेल्या सूचनेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-अ अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार राज्य शासन राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेमधील सभासदांना, मा. केंद्रीय निवडणूक आयोग राबवित असलेल्या निवडणूकपूर्व कार्यक्रमास संपूर्णपणे सहकार्य करणेबाबत अनिवार्य करण्यात येत आहे. म्हणून ज्या सदस्यांना मतदारांच्या यादी विषयी दावा अथवा आक्षेप असतील त्यांनी "फॉम नं.६" मध्ये माहिती भरुन द्यावी. त्याच फॉर्ममध्ये नवीन मतदारांचे नांव अंतर्भूत करता येतील. मृत अथवा इतरत्र राहण्यासाठी गेलेल्या मतदारांचे नांव वगळण्यासाठी "फॉम नं. ७" आणि सध्या असलेल्या मतदार यादीत सुधारणा अथवा बदल करण्यासाठी तसेच फोटोग्राफ देण्यासाठी "फॉम नं.८" असून "फॉम नं.८-अ" सध्याच्या नोंदीत काही सुधारणा करणे असल्यास भरुन देणे आवश्यक आहे. याकार्यवाहीमुळे मतदारांचे फोटो यादीत योग्य त्या सुधारणा करणे शक्य होईल. अशा परिस्थितीत महानगरपालीका क्षेत्रातील आणि नगरपालिका क्षेत्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी आपल्या सभासदांबाबतची माहिती भरुन त्यांच्या क्षेत्राशी संबंधित असलेल्या "मतदार नोंदणी अधिका-याकडे" देणे अनिवार्य करण्यात येत आहे. सर्व विभागीय सह निबंधक, जिल्हा उपनिबंधक, उपनिबंधक सहकारी संस्था यांना असे सूचित करण्यात येत आहे की, वरील सूचना राज्यातील नगरपरिषदा, महानगरपालिका क्षेत्रासहीत सर्व गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणाव्यात व या संस्थांची वरीलप्रमाणे माहिती भरुन दिल्याबाबतची खात्री करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.internet.maharashtra.gov.in या बेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४१९१८४०४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु.ल.तिडके )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
३) सर्व जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
४) मुख्य निवडणुक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) सर्व जिल्हाधिकारी,
६) निवड नस्ती १४-स.

Please purchase PDF Split-Merge on www.verypdf.com to remove this watermark.

GENERAL ELECTION TO THE LOK SABHA /STATE ASSEBLIES

AND REVISION OF VOTERS LIST WITH PHOTOGRAPHS.

Government of Maharashtra

Co-operative, Panan and Textile Industry Dept.

Govt. Decision No. SGY-2009 No. 235/14-s

Mantralaya Extension, Mumbai-400 032

Dataed 19 April 2010

CIRCULAR

The Central Election Commission, New Delhi and on their behalf the work of revision and making electoral rolls/election identity cards upto date is regularly going on. For this purpose a number of registered co-operative societies, it is observed, do not give necessary co-operation to the personnel appointed by the State Election Commission/ District Election Officers. Hence the Chief Election Officer of this state relying on Central Govt. Concerned resolution and also relying on the guide lines of Maharashtra Co=operative Society Act 1960, Clause 79-A and replying on the power vested in it the State Government and the registered co-operative societies, the Hon Central Election Commission who is responsible for implementation of the programme prepared prior to the election and is now obligatory and hence it is suggested that those members who have got objection regarding the list of voters should fill up Form No.6 giving necessary information and in this form itself the names of new voters can also be included. As far as the voters who are deceased and voters who have gone to stay elsewhere and for the purpose of omitting their names should give duly filled up Form No.7 and the purpose of making necessary changes in the current voter list and to give photographs Form No.8 may be used. And Form No. 8-A is required to the filled in for the purpose of making some improvements in current voter list. Because of this procedure it will be possible to revise the photo list of voters , Under these circumstances it is obligatory for the co-operative housing societies within the limits of municipal co-operations and municipal committees are enjoined to give the Voters Enumerating

Please purchase PDF Split-Merge on www.verypdf.com to remove this watermark.

Officers concerned area. Hence all the additional Sub Registrars, Dist Deputy Registrars, Deputy Registrars of Co-operative Societies are accordingly informed that the above instructions should be communicated to all Nagar Parishads, Municipal Co-operations and Point out to the co-operative housing societies under their jurisdiction and make sure that relevant information is duly furnished.

This circular is made available on www.intranet.maharashtra.gov.in of Maharashtra Govt. website. Their computer code No. is 20100419184001.

By order and in the name of Governor of Maharashtra.

Sd/x x x

(S.L.TIDKE)

Under Secretary , Govt. Of Maharashtra

Co-operative, Panan and Textile Industry Department

Copy to:-

1. Co-operative Commissioner and Registrar, Co-operative Societies, Govt. of Maharashtra, Pune .
2. All Divisional Sub Registrars, Co-operative Societies.
3. All Dist Sub Registrars, Co-operative Societies.
4. Chief Election Officer, General Administration Department. Mantralay , Mumbai-400 032.
5. All District Collectors.
6. Election 14-s.

Please purchase PDF Split-Merge on www.verypdf.com to remove this watermark.